# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप, नरेंद्र जाधव समिती तत्काळ रद्द करावी यासह १७ ठराव मंजूर
- भारत आघाडीचा तांदूळ निर्यातदार, २०२५ मध्ये देशात १५ कोटी टनांपेक्षा जास्त तांदूळ उत्पादन
- विकसित भारत- जी राम जी योजनेतल्या तरतुदींबद्दल कामगार वर्गातून समाधान
- महानगरपालिकांच्या निवडणूक प्रचाराला वेग, मराठवाड्यात आज प्रमुख राजकीय नेत्यांच्या प्रचारसभा

आणि

- २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेचं यजमानपद मिळवण्यासाठी भारताचे प्रयत्न, पंतप्रधानांची माहिती

****

मराठी केवळ आपली भाषा नव्हे तर ओळख असून, ती वृद्धिंगत करणं ही सामूहिक जबाबदारी असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. सातारा इथं ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा काल समारोप झाला, त्यावेळी ते बोलत होते. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त गुजराती लेखक रघुवीर चौधरी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. मराठी भाषा मंत्री उदय सामंत, संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यावेळी उपस्थित होते. समाजमाध्यमांवर मराठीचा वापर वाढत असला तरी व्यावसायिक क्षेत्रात तिचं महत्त्व वाढवण्याची गरज शिंदे यांनी अधोरेखित केली. ते म्हणाले:

**बाईट – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मराठी भाषेच्या संवर्धनात, साहित्य संमेलनं महत्त्वाची भूमिका बजावतात, या आयोजनात, कधीही कसलीही कमतरता भासू देणार नाही, असंही शिंदे यांनी आश्वस्त केलं. मराठी पुस्तकांच्या दुकानांसाठी एस टी महामंडळाच्या आवारात ५० टक्के सवलतीच्या दरात जागा उपलब्ध करुन देण्याचा, तसंच अत्याधुनिक ग्रंथालयं उभारण्याचा निर्णय लौकरच होईल, असंही शिंदे यांनी सांगितलं.

**

ग्रामीण भागातल्या साहित्यिकांचं साहित्य, इतर भाषेत अनुवादित करण्यासाठी पुढील वर्षांपासून यशवंतराव चव्हाण यांच्या नावानं भाषा अनुवादीत समिती कार्यान्वित करण्याची घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी यावेळी केली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचं १०० वं शतकपूर्ती मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार असल्याची घोषणा महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी केली.

**

या संमेलनात साहित्यिक आणि लोककलावंत अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यात यावा, यासह मराठी भाषा, शिक्षण, संस्कृती आणि मराठी भाषिकांच्या हक्कांशी संबंधित एकूण १७ ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. हिंदी किंवा तिसरी भाषा सक्तीच्या प्रयत्नांना ठाम विरोध करत नरेंद्र जाधव समिती तत्काळ रद्द करावी आणि राज्यात कोणत्याही शाळेत हिंदी वा तिसरी भाषा सक्तीची होणार नाही, याचं राज्य शासनाने लेखी अभिवचन द्यावं, या ठरावाचा यात समावेश आहे.

****

२०२५ या वर्षात देशात १५ कोटी टनांपेक्षा जास्त तांदूळ उत्पादन झाल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं काल लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. तांदूळ उत्पादनात भारताने चीनला मागे टाकलं असून, भारत हा जगातला आघाडीचा तांदूळ निर्यातदार देश बनल्याचं चौहान यांनी सांगितलं. काही वर्षांमध्ये देशात बियाण्यांची तीन हजार २०० पेक्षा जास्त वाण विकसित करण्यात आले असून, ते शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, काल दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना चौहान यांनी, विकसित भारत–जी राम जी योजना कष्टकर्यांच्या फायद्याचीच असून, याद्वारे वाढीव मानधन, बेरोजगार भत्ता, मानधन विलंबासाठी व्याज, शंभर ऐवजी सव्वाशे दिवस रोजगाराची हमी देण्यात आली असल्याचं सांगितलं. या योजनेद्वारे कष्टकरी ग्रामविकासात सार्थकपणे योगदान देतील असं ते म्हणाले.

**

जालना जिल्ह्यातल्या माळशेंद्रा इथले कष्टकरी देविदास कारभारी कापसे यांनी ही योजना लागू झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. ते म्हणाले,

**बाईट – देविदास कारभारी कापसे**

धाराशिव जिल्ह्यातल्या उपळा माकडाचे या गावचे लाभार्थी रोहीत राम कांबळे यांनी या योजनेत गावातच काम मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. ते म्हणाले,

**बाईट – रोहीत राम कांबळे**

****

राज्यातल्या २९ महापालिकांच्या निवडणूक प्रचारानं वेग घेतला आहे. ठिकठिकाणी प्रचार फेऱ्या, सभा सुरू झाल्या आहेत. काल रविवार–सुटीचा दिवस असल्यानं राजकीय पक्ष, वैयक्तिक उमेदवारांनी ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रचार केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज मराठवाड्याच्या दौर्यावर येणार आहेत. जालना, संभाजीनगर, परभणी आणि नांदेड इथं महापालिका निवडणुकीतल्या उमेदवारांच्या प्रचारात ते सहभागी होणार आहेत.

दरम्यान, फडणवीस काल चंद्रपूरमध्ये प्रचारात सहभागी झाले होते. महापालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून गेल्याबद्दल विरोधी पक्षांनी न्यायालयात धाव घेतली, तरी जनादेश महायुतीच्या बाजूनेच असेल असं ते यावेळी म्हणाले. बिनविरोध निवडीला न्यायालयात आव्हान दिलं जाईल, या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वक्तव्यावर मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली.

**

विकसित महाराष्ट्रासाठी जनता महायुतीला मतदान करेल असा विश्वास भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर केलेल्या टीकेवर बोलताना याचा महायुतीच्या स्थैर्यावर कोणताही परिणाम होणार नाही असंही बावनकुळे यांनी सांगितलं.

**

छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेनेच्या प्रचाराचा प्रारंभ खासदार संदीपान भुमरे यांच्या उपस्थितीत काल झाला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचाराला नेते अंबादास दानवे यांनी सुरुवात केली. भारतीय जनता पक्षानं पक्षाविरोधी बंडखोरी करणाऱ्या २२ उमेदवारांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला असल्याचं जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी सांगितलं.

****

मुंबई महापालिकेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. दोन्ही पक्षाचे प्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईत शिवसेना भवन इथं जाहीरनामा प्रसिद्ध करत वार्ताहरांशी संवाद साधला. राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला यावेळी दोन्ही नेत्यांनी विरोध केला. ज्या ठिकाणी विरोधी उमेदवार नाहीत तिथली प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रिया राबवावी अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. राज ठाकरे यांनीही बिनविरोध निवडीला विरोध करत, भाजप चुकीचे पायंडे पाडत असून, जनतेनं याचा विचार करायला हवा असं म्हटलं आहे.

****

वर्ष २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेचं यजमानपद मिळवण्याकरता भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं उद्घाटन त्यांनी काल दूरस्थ पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. विविध खेळांमध्ये २०१४ सालापासून देशाची कामगिरी सातत्यानं सुधारत असून, ‘जेन झी’ ची तरुण पिढी हातात तिरंगा घेऊन भारताचं प्रतिनिधित्व करताना पाहून देशाचा उर अभिमानानं भरून येतो, असं पंतप्रधान म्हणाले. जेव्हा प्रत्येकजण आपापल्या जबाबदाऱ्या गांभीर्यानं पार पाडतो, तेव्हाच यशाचं शिखर गाठता येतं. देशाचा प्रवासही याच दिशेनं होत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

राज्यातली आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची दिल्ली इथं महत्त्वपूर्ण आढावा बैठक झाली. या बैठकीत राज्यातल्या राष्ट्रीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणं, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांचं बळकटीकरण करणं, आणि रुग्णकेंद्रित सेवा देणं बाबत सखोल चर्चा करण्यात आली.

****

परिवर्तन घडवण्यासाठी एखाद्या माणसानं पाय रोवून उभं राहावं लागतं, असं प्रतिपादन राष्ट्रीय सेवा भारती, भोपाळचे सह-संघटनमंत्री विजयराव पुराणिक यांनी केलं. छत्रपती संभाजीनगर इथं सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रबोधन आणि सेवा पुरस्कारांचं वितरण काल करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. नाशिक जिल्ह्यातल्या त्र्यंबकेश्वर तालुक्यात हिवाळी पाडा इथं अभिनव प्रयोगातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावणारे शिक्षक केशव गावित यांना डॉ. रखमाबाई राऊत सेवा पुरस्कार आणि तृतीयपंथीयांच्या स्वयंपूर्णतेसाठी काम करणाऱ्या नांदेड जिल्ह्याच्या नायगाव तालुक्यातल्या फरीदा गुरू यांना डॉ. भीमराव गस्ती प्रबोधन पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला.

****